**<u>ठळक बातम्या</u>**

- महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारांच्या बिनविरोध निवडीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमधे आरोप-प्रत्यारोप

- न्यायालयीन कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे काम लावण्याचा निर्णय चुकल्याची मुंबई महापालिकेची कबुली

- निविदा प्रक्रिया गतीमान करुन वर्षअखेरपर्यंत ८ हजार बस एसटीच्या ताफ्यात दाखल करण्याचे परिवहन मंत्र्यांचे आदेश

**आणि**

- हजारे चषकासाठी मुंबईच्या कर्णधारपदाची धुरा आता श्रेयस अय्यरकडे

**<><><><><>**

महापालिका निवडणुकांमध्ये बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांच्या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकारण तापलं आहे.

महानगरपालिका निवडणुकीत महायुतीने आपले उमेदवार बिनविरोध निवडून आणल्याचा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी निषेध केला. हे उमेदवार लोकप्रिय आहेत, म्हणून बिनविरोध निवडलेले नसून पैसा आणि धाकदपटशाच्या जोरावर झालेले आहेत, अशी टीका सपकाळ यांनी केली आहे. मुंबईत पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मनसेनंही असाच दावा केला आहे. ठाणे महानगरपालिका निवडणुकीत अर्ज मागे घेणाऱ्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या तीन उमेदवारांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी माजी खासदार राजन विचारे आणि मनसे नेते अविनाश जाधव यांनी ठाणे पोलिसांकडे

केली आहे. यावर निवडणूक आयोगाकडून अहवाल आल्यानंतर कारवाई करू असं पोलिसांनी सांगितलं.

सत्ताधाऱ्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून तसंच, पैशांचं आमिष दाखवून या तिघांना उमेदवारी अर्ज मागे घेण्यास भाग पाडल्याचा आरोप विचारे आणि जाधव यांनी केला आहे.

बिनविरोध निवडून आलेल्यांच्या निवडीला स्थगिती देण्याची आणि या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणीही मनसेनं राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे.

<><><><><>

बिनविरोध होत असलेल्या निवडणुका लोकशाहीसाठी चांगल्या असल्याचं मत भाजपा नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केलं आहे. बिनविरोध निवडणूक होऊ नये असं कुठल्याही कायद्यात लिहिलेलं नाही, निवडणूक आयोगाची याला परवानगी आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले. छत्रपती संभाजीनगर विमानतळावर ते वार्ताहरांशी बोलत होते. बिनविरोध निवडणुकांना विरोध करणाऱ्यांनी योग्य व्यासपीठावर न्याय मागावं, असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

परभणी महानगरपालिकेत भूमीगत गटार योजना आणि सुधारित पाणी पुरवठा योजनेसाठीचा महानगरपालिकेचा ३० टक्के हिस्सा राज्य सरकार भरेल असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं. ते आज परभणीत प्रचारसभेत बोलत होते. घनकचरा प्रकल्पाचं काम, रेल्वेमार्गाचं दुहेरीकरण ही कामंही पूर्ण करू असं आश्वासन देत महायुतीला निवडून देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे मुंबईत पक्ष शाखांना भेट देत आहेत. याशिवाय दादरमध्ये शिवाजी पार्क, ठाणे, कल्याण - डोंबिवली आणि नाशिकमधे संयुक्त प्रचारसभा होईल. छत्रपती संभाजीनगरमधेही माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सभा घेणार आहेत.

**<><><><>**

मुंबईतल्या कनिष्ठ न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांना निवडणुकीचं  काम देण्याचा आपला निर्णय चुकल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी मान्य केलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेतली असून आयुक्तांनी आपलं कार्यक्षेत्र ओलांडल्याचे निरीक्षण नोंदवलं आहे. आयुक्तांनी निवडणुकीच्या कामासाठी कर्मचाऱ्यांची व्यवस्था इतर ठिकाणांहून करावी, असं उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम आंखड यांच्या पीठानं म्हटलं आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी निवडणुकींनंतर करण्यात येईल असं न्यायालयानं म्हटलं आहे.

राज्यातल्या सर्व न्यायालयांच्या कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामातून वगळण्याचा निर्णय सप्टेंबर २००८ मध्ये उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या समितीने घेतला होता.

**<><><><>**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कल्याण प्रभाग तीन मधे अडीच हजाराहून अधिक प्रतिबंधात्मक कारवाया केल्याचं पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितलं. तेराशे एक परवानाधारक बंदुकांपैकी अकराशे दहा शस्त्रं जप्त करण्यात आली आहेत. दोन गावठी कट्टे, दोन काडतुसं, ४५ चाकू, पाच कोयते आणि तीन तलवारीही जप्त करण्यात आल्याचं झेंडे यांनी सांगितलं. याशिवाय ७७९ लिटरहून अधिक देशी आणि विदेशी दारू, पावणे दोन किलो गांजा,

तसंच १२० बॉटल कोडीन सीरपही जप्त केलं आहे. ९ लाख रुपये रोख रक्कम जप्त केली असून दहा गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलं आहे.

**<><><><>**

एसटी, अर्थात राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात ८ हजार नवीन बसेस या वर्षअखेरपर्यंत दाखल करा, त्यासाठी सध्या सुरू असलेली निविदा प्रक्रिया तातडीनं गतिमान करा, अशा सूचना परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिल्या आहेत. ते एसटी महामंडळाच्या सन २०२५–२६ च्या अर्थसंकल्पीय निधीच्या वापराबाबत बोलावलेल्या आढावा बैठकीत बोलत होते. यंदाच्या अर्थसंकल्पात एसटीसाठी शासनानं २ हजार ४६० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र आर्थिक वर्ष संपायला अवघे तीन महिने शिल्लक असताना त्यापैकी सुमारे १ हजार ६०० कोटी रुपये खर्चाविना परत जाण्याची स्थिती निर्माण झाली असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. उरलेल्या तीन महिन्यांत जास्तीत जास्त निधी खर्च करून नवीन बसेस, बसस्थानकं, प्रसाधनगृहं आदींच्या निर्मितीसाठी आवश्यक निविदा आणि प्रशासकीय प्रक्रिया तातडीनं पूर्ण कराव्यात, आणि प्रकल्पांना गती द्यावी, असे निर्देश सरनाईक यांनी दिले.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षी पार पडलेल्या वेव्ज परिषदेत संगीत आणि कला क्षेत्रातल्या अनेक नवीन आंतरराष्ट्रीय प्रकल्पांची बीजे रोवली गेली होती, त्याचा परिणाम म्हणून आज संगीत क्षेत्रातला जागतिक पातळीवरचा पहिला करार मुंबईत होत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. युनिव्हर्सल म्युझिक ग्रुप आणि एक्सेल एंटरटेनमेंट यांच्यामध्ये आज मुंबईत धोरणात्मक भागीदारी कराराची घोषणा करण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. सरकारच्या व्यवसायसुलभतेच्या धोरणामुळे इथली आशयनिर्मितीची गुणवत्ता आणि क्षमता वाढली आहे, त्यामुळे कलाक्षेत्रात आपला ठसा उमटवण्याची इच्छा

असलेल्या जगभरातल्या सर्व निर्मात्यांचं महाराष्ट्रात आणि मुंबईत स्वागत आहे, असं फडणवीस यावेळी म्हणाले.

<><><><><>

बुलढाणा जिल्ह्यात ढाल सावंगी गावाजवळ बसची दुचाकीला धडक बसून झालेल्या अपघातात तीन जण ठार झाले. ही बस छत्रपती संभाजीनगरहून मलकापूरच्या दिशेने जात होती. दुचाकीवरून येणाऱ्या तीन जणांना बसची धडक बसून हा अपघात झाला.

<><><><><>

विद्यार्थिनीच्या संशयास्पद मृत्युप्रकरणी आज तिच्या नातेवाईकांनी लातूर शहरात गांधी चौकात रास्तारोको आंदोलन केलं. या विद्यार्थिनीचा मृतदेह काल नवोदय विद्यालयाच्या वसतिगृहात आढळला होता. ही आत्महत्या नसून घातपात असल्याच्या संशयावरून विद्यार्थिनीची आई आणि अन्य महिलांनी आंदोलन केलं.

<><><><><>

बीड शहरात तारांगण आणि विज्ञान केंद्र उभारण्याला प्रशासकीय मान्यता मिळाल्याची माहिती आमदार विजयसिंह पंडित यांनी दिली. विज्ञान केंद्रांमधे चार माहिती केंद्र असतील तर तारांगणामधे विविध ग्रह, तारे, उल्का, आकाशगंगा आदींची माहिती दिली जाणार आहे. २८ कोटी रुपये खर्चाचं हे तारांगण आणि विज्ञान केंद्र उभारण्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली होती.

<><><><><>

ग्रामीण रोजगारासाठीचा मनरेगा कायदा रद्द करून नवीन व्ही बी जी राम जी ही योजना केंद्र सरकारने लागू केली आहे. ग्रामीण भागातही या योजनेचं स्वागत होत आहे. यवतमाळ जिल्ह्यातले रोजगार सेवक महेंद्र अगलधरे यांनी आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया दिली.

**होल्ड बाईट महेंद्र**

**<><><><><>**

विजय हजारे करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबई संघाचा कर्णधार शार्दुल ठाकूर जायबंदी असल्यानं संघाच्या उर्वरित साखळी सामन्यांसाठी श्रेयस अय्यरकडे कर्णधारपद सोपवलं असल्याचं मुंबई क्रिकेट असोसिएशननं आज जाहीर केलं. या स्पर्धेत क गटात मुंबई सध्या दुसऱ्या स्थानावर असून, त्यांचा पुढचा सामना उद्या हिमाचल प्रदेशाशी, तर गुरुवारी पंजाबशी होणार आहे.

**<><><><><>**

४४ व्या कनिष्ठ गट राष्ट्रीय खोखो स्पर्धेत काल झालेल्या मुलींच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्रानं ओदिशावर ३४-३३ असा विजय मिळवत विजेतेपद कायम राखलं. तर, मुलांमधे यजमान कर्नाटकानं गतविजेत्या महाराष्ट्रावर ३५-३० अशी मात करत विजेतेपद पटकावलं. मुलांमधे उत्कृष्ट खेळाडू म्हणून स्नेहा लामकानेनं जानकी पुरस्कार पटकावला. मुलांमधे बी. विजय वीर अभिमन्यू पुरस्काराचा मानकरी ठरला.

वरीष्ठ गट राष्ट्रीय खो खो स्पर्धा येत्या ११ ते १५ तारखेदरम्यान तेलंगणात काझिपेट इथं होणार आहे.

**//<><><><><>//**